Department of geography

Date : 01 octo 2019

COMPANY : इंडो जपान माहिती व संशोधन केंद्र जपान : k 136

Activity/ objectives:

1 ) introduce knowledge about japan language & GIS to student.

2) the student got information about the jobs to student.

Scanned with CamScanner

# 'शिवाजी'चा इंडो जपानशी सामंजस्य करार

अमरावती (प्रतिनिधी) : श्री शिवाजी कला, वाणिज्य महाविद्यालय व इंडो-जपान माहिती व संशोधन केंद्राच्या के-१३६ प्रकल्पांतर्गत नुकतेच जागतिक व्यवसाय व जपानमधील रोजगाराच्या संधी या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले होते.



कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख, तर प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष नरेशचंद्र ठाकरे, के-१३६ प्रकल्पाचे संचालक इसाम कोयाम, युतो मोरीता, शशांक वाडेकर उपस्थित होते. जपानचे भारतात सुरू असलेले प्रकल्प व त्यातून निर्माण होणाऱ्या रोजगारांच्या संधीकरिता जपानी भाषेचे ज्ञान आवश्यक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्या याकरिता श्री शिवाजी कला, वाणिज्य महाविद्यालय व इंडो-जपान माहिती व संशोधन केंद्रामध्ये सामंजस्य करार करून महाविद्यालयात जपानी भाषा शिकवणी वर्ग सुरू करण्यात आले.

जपानी भाषा शिकून रोजगारांच्या संधी प्राप्त करणारे सौरभ नेमाड, सुयोग धावडे आदींनी अनुभव कथन करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्किल डेव्हलपमेंट अँड प्लेसमेंट सेलचे समन्वयक प्रा. चेतन राऊत यांनी केले, तर आभार डॉ. देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. महेंद्र मेटे, डॉ. किशोर साबळे, डॉ. मनोज जगताप, डॉ. जयराम गायकवाड, डॉ. किशोर फुले, डॉ. वर्षा चिखले, डॉ. अर्चना बोबडे, डॉ. नितीन चांगोले, डॉ. उमेश कडू, डॉ. राजेश बुरंगे, प्रा. दीपक जागृत, डॉ. मनोज जोशी, डॉ. अपर्णा सरोदे, डॉ. संगीता भुयार, डॉ. सुभाष गावंडे आदी उपस्थित होते.

जपानी भाषेसाठी इंडो-जपानसोबत केलेल्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी करताना मान्यवर.

Scanned with CamScanner